

ISSN : 2349-638X
Impact Factor : 6.293

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि एकविसावे शतक

: संपादक :
डॉ. लहू वाघमारे






AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

[ ISSN 2349-638X ]

# SPECIAL ISSUE

| Sr. No. | Title of Article |
|---|---|
| 1 | SPECIAL ISSUE ON NATIC |

Impact Factor - 6.293

ISSN-2349-638x

# Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

Special Issue No.75

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि एकविसावे शतक

Editor

Dr. Lahu Waghmare

Executive Editor

Dr. Anil Singare

Dr. Arvind Kadam

Co- Editor

Dr. Omshiva Ligade

Prof. Amol Pagar

IMPACT FACTOR

SJIF 6.293

For details Visit our website

www.aiirjournal.com

| Sr.No. | Name Of Author | Title Of Paper | Page No. |
|---|---|---|---|
| 38 | डॉ. संजीव कोळपे | डॉ. बाबासाहेब आंबेडकर याचे शेतीविषयक विचार व कार्य एक चिकीत्सा | 153 |
| 39 | डॉ. सजीवनी चंद्रशेखर बारहाते | 21 वे शतक आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर याचे स्त्री सुधारणा विषयक विचार व कार्य | 157 |
| 40 | प्रा.डॉ.सतीश गंगाराम ससाणे | २१ वे शतक आणि डॉ . बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार व कार्य | 162 |
| 41 | उमा ज्ञानोबा साठे | हिंदू कोड बिल आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर | 166 |
| 42 | डॉ. शैला चव्हाण | डॉ. बाबासाहेब आंबेडकर याचे शैक्षणिक विचार | 170 |
| 43 | डॉ.बाबासाहेब केशवराव शेप | 21 वे शतक व डॉ. बाबासाहेब आंबेडकर याचे धार्मिक विचार | 174 |
| 44 | सिल्केषा अहिरे | डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे स्त्रीमुक्तीविषयक विचार आणि समकालीन स्त्रीप्रश्न | 179 |
| 45 | प्रा.मीरा माधवराव देठे | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री उध्दारविषयक कार्य | 185 |
| 46 | डॉ. रामेश्वर नारायण बाबर<br>डॉ.सोमेश्वर नारायण बाबर | एकविसावे शतक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आर्थिक विचाराची प्रासंगीकता | 191 |
| 47 | सुहास मुरलीधर उघडे | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची शिक्षण विषयक भूमिका | 196 |
| 48 | आयुष्यमानिनि सुनिता विलास आल्टे (शिंदे) | बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची धम्मक्रांती आणि एकविसावे शतक | 199 |
| 49 | प्रा.सुनिता भगवान पाटील | २१ वे शतक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षणविषयक विचार | 201 |
| 50 | प्रा.सुनिलचंद्र सोनकांबळे | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक लढयातील सवर्ण सुधारक | 204 |
| 51 | डॉ.सुरेखा भागुजी भिंगारदिवे (गायकवाड) | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कामगारविषयक विचार | 208 |
| 52 | डॉ. सुरेखा वैजनाथराव दाडगे | 21 वे शतक आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार | 212 |
| 53 | डॉ.सुशीलप्रकाश चिमोरे | २१ व्या शतकातील दलित कवितेतील आंबेडकरी मूल्याविष्कार | 215 |
| 54 | श्री.तानाजी पंढरी गायकवाड<br>डॉ. व्ही. एच निंबाळकर | २१ वे शतक आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री सुधारणाविषयक विचार आणि कार्य | 224 |
| 55 | प्रा. तातेराव जगन्नाथराव नंदवे | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची ग्रंथसंपदा | 233 |

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शेतीविषयक विचार व कार्य : एक चिकित्सा

डॉ.संजीव कोळपे

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गंगाखेड

## प्रस्तावना

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य म्हणजे सत्याचे, समर्पण भावाचे, दूरदृष्टीचे, बुद्धिमत्तेचे, मानवतावादी विचाराचे, राष्ट्रभक्तीचे, राष्ट्रहिताचे आणि सर्व समाजाच्या कल्याणासाठी आपले जीवन समर्पित करून भारताच्या इतिहासातील गौरवशाली पर्वाची सुरुवात असून हे भारतीय अस्मितेचे प्रतिक आहे. यांनी उपेक्षित समाजाच्या कल्याणासाठी अभूतपूर्व योगदान दिले आहे. त्यांच्या मते वंचित, उपेक्षित आणि महिलांसाठी सामाजिक समतेचे समान हक्क आणि अधिकार मिळावेत यासाठी लढा दिला. डॉ.आंबेडकर हे शोषितांच्या मुक्तीचा आणि सामाजिक समतेच्या क्रांतिशील विचारांचा पुरस्कार करणारे सामाजिक क्रांतीचे अग्रदूत होते. या लेखाच्या निमित्ताने त्यांच्या समतावादी विचारांचा आणि चळवळींचा मागोवा घेतला जाईल. डॉ.आंबेडकर हे महामानवाचे व एका समाजाचे नाहीत तर संपूर्ण शतकाचे व शतकाला माणुसकीची प्रेरणा देणारे ते एक अद्वितीय असे व्यक्तिमत्व आहे. हे शेतकऱ्यांचे कैवारीही होते पण हे घटनेचे शिल्पकार आणि दलितांचे कैवारी म्हणून सर्वपरिचित आहेत. तथापि ग्रामीण भागाचे हितरक्षक आणि शेतकऱ्यांच्या परिवर्तनासाठी मांडलेले विचार फारसे पुढे आले नाहीत. त्यामुळे शेतीची हानी झाली. त्यांचे शेती आणि ग्रामीण समाजाबाबतचे विचार शेतकऱ्यांसाठी, नियोजनकार व राज्यकर्त्यांसाठी मार्गदर्शक ठरणारे आहेत. यांना ग्रामीण समाजव्यवस्थेची प्रचंड जाण होती. तितकेच शेतीबद्दलही भान होते. दुर्दैवाने अनेकांना डॉ. आंबेडकर हे शेतकऱ्यांचे कैवारी होते हे अजूनही ठाऊक नाही. त्यांच्या विचारांच्या उपेक्षेतून शासनकर्त्यांची उदासीनता प्रकर्षाने दिसते. सर्व समाजाच्या कल्याणाचे दर्शन घडविणारे डॉ.आंबेडकर ज्ञानयोगी, विश्वयोगी होते. या पार्श्वभूमीवर डॉ.आंबेडकर यांच्या शेतीविषयक सूचनांची अंमलबजावणी केली, तर शेती व ग्रामीण भागाचे परिवर्तन नक्कीच घडेल. देशात होत असलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या, शेतीसमोरचे प्रश्न यांचा विचार केला, तर आजही डॉ.आंबेडकरांचे स्मरण प्रेरणादायी ठरणारे आहे.

## उद्दिष्टे

१. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कृषी विषयक विचारांचा अभ्यास करणे.
२. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या शेतकरी चळवळीचा आढावा घेणे.
३. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे ग्रामीण समाज व्यवस्थेबद्दलचे कार्य अभ्यासणे.

## शेती व्यवसायाविषयी डॉ.आंबेडकर यांचे विचार व कार्य:

भारत हा कृषीप्रधान देश म्हणून ओळखला जातो. डॉ.आंबेडकरांना कृषी व्यवसायासंबंधी देखील चांगली जाण होती. भारतासारख्या कृषीप्रधान देशात ते सामुहिक शेतीचे पुरस्कर्ते होते. पूर्वी शेती व्यवसायात खोती पद्धतीमुळे शेतकऱ्यांवर खुप अन्याय होत असे. यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक शोषण होत असे. तेव्हा डॉ. आंबेडकर यांनी खोती पद्धत नष्ट करणारे कायदे केले. त्यामुळे हे शेतकऱ्यांचे कैवारी म्हणून ओळखले जाऊ लागले. यांना ग्रामीण समाज व्यवस्थेची जाण होती. तितकेच शेतीबद्दलही भान होते.

ग्रामीण भागात विखुरलेला समाज एकसंघ करण्यासाठी शेतीचे चित्र बदलले पाहिजे यासाठी ते सतत आग्रही असायचे. देशातील राज्यकर्ते व शेतकरी यांची शेती बद्दलची मानसिकता ही एक केवळ उदरनिर्वाहाचे साधन म्हणून पाहण्याची होती. या मानसिकतेला त्यांचा आक्षेप होता. कारण शेती ही राष्ट्रीय उत्पन्नाचा स्रोत आहे. ती केवळ उपजिविकेचे साधन नाही. शेतकरी व शेतमजूर यांना रोजगार देण्याचे ते माध्यम आहे. एवढेच नव्हे तर शेती ही ग्रामीण भागाच्या आर्थिक विकासाचा केंद्रबिंदू आहे. त्यामुळे शेतीकडे सर्वांनी उद्योग म्हणून पाहण्याचा दृष्टीकोण असणे गरजेचे आहे. यासाठी ते आग्रही होते. ग्रामीण भागात आर्थिक परिवर्तन घडवण्यासाठी शेतीचा विकास करून

शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम बनला पाहिजे. त्यामुळे राष्ट्राची अर्थव्यवस्थाही मजबूत होईल. ग्रामीण भागातील लोकांचे रोजगारासाठीचे स्थलांतरही होणार नाही. इतक्या सखोलतेने व दूरदृष्टीने यांनी शेतीकडे पाहिले.

शेतकऱ्यांच्या शोषणाबाबतही यांनी परखड विचार मांडले आहेत. शेतकऱ्याला आर्थिक पाठबळ शासनाकडून न मिळाल्याने तो सावकाराचा आधार घेत असतो. त्यानंतर मात्र सावकाराच्या पाशातून त्यांची मरणापर्यंत सुटका होत नाही. शेतीतल्या खोती पद्धतीबद्दलही त्यांनी अतिशय कडक शब्दात भाष्य केले आहे. कारण शेतकरी कष्ट करतो व खोतकरी फुकटचे खातो हे त्यांना कदापिही मान्य नव्हते. खोतांना व सावकारांना ते 'आयत्या बिळावरचे नागोबा' असे संबोधित असे. इतक्या शेलक्या व मोजक्या शब्दात त्यांनी सावकारी व्यवस्थेचे वाभाडे काढले. या व्यवस्थेला हद्दपार करण्यासाठी शेतकऱ्यांना बियाणे, पाणी आणि पीक जोपासना खर्च शासनानी दिला पाहिजे असे त्यांचे मत होते. शासनाला महसूल देणाऱ्या शेतीचे आर्थिक उत्तरदायित्व शासनाने उचलावे. उत्तरदायित्व या शब्दातून शासनाने शेतकऱ्यांचे पोशिंदा म्हणून असलेले ऋण फेडावे असे यांना अपेक्षित होते.

डॉ.आंबेडकर यांनी शेती या व्यवसायाचा संबंध समाजव्यवस्थेशी जोडला होता. ग्रामीण भागात जातीवर आधारित समाज व्यवस्था दिसत होती. त्याचे कारण त्यांनी आर्थिक व्यवस्थेत शोधले होते. त्यांच्या मते जातीवर आधारित समाज व्यवस्था बदलायची असेल तर शेतीमध्ये त्यासाठी परिवर्तन घडवावे लागेल. शेती व्यवसायाला उद्योग मानून शेतीसाठी पायाभूत सुविधा पुरवून शेतकऱ्याचा आर्थिक विकास झाला पाहिजे. या आर्थिक सक्षमतेमुळे शेतकरी आर्थिक समृद्ध तर होईलच त्याबरोबर शेतमजूर व शेतीशी निगडित सर्वच घटकाला याचा फायदा होईल. आर्थिक स्रोत तळागाळापर्यंत पोहचले की ग्रामीण माणसाच्या मानसिकतेत सकारात्मक बदल घडण्यासाठी मदत होईल व हे बदल सामाजिक परिवर्तनाची नांदी ठरतील. जातीय व्यवस्थेला आर्थिक विषमता ही पूरक व पोषक ठरत आहे. यासाठी आर्थिक विषमता जितकी कमी होईल तितकीच जातीय भेदभावाची व्यवस्था नष्ट करण्यासाठी मदत होईल असे मत मांडले.

डॉ.आंबेडकरांच्या मते पाणी आणि वीज यांचा समानरीत्या पुरवठा झाला तर देश समृद्ध होण्यास वेळ लागणार नाही. शेतीव्यवसायासाठी जमीन व पाणी हे मुख्य घटक आहेत. शेती विकासासाठी पाणी हे अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठी शाश्वत पाणी शेतकऱ्याला मिळणे गरजेचे आहे. कारण पाण्याशिवाय शेतीची उत्पादकता वाढणे आणि शेतकऱ्याचा आर्थिक स्तर उंचावणे शक्य नाही. हे त्यांनी ब्रिटीश सरकारच्या निदर्शनास आणून दिले होते. नदीच्या पाण्याचे नियोजन केले तरच शेतीला शाश्वत पाण्याचा पुरवठा करता येईल. देशात पडणारे दुष्काळ हे मानवनिर्मित आहेत. शेतीचा दुष्काळ हटवण्यासाठी पाण्याचे नियोजन करणे गरजेचे आहे. जिरायती शेती बागायती करण्याचे प्रयत्न वाढवावे. यांच्या मते देश समृद्ध होण्यासाठी शेतकरी व शेतमजूर समृद्ध झाला पाहिजे. असे मौलिक विचार यांनी मांडले. एवढेच नव्हेतर यांनी पाण्यासंदर्भात केवळ विचार न मांडता ब्रिटीश सरकारला नदीच्या खोऱ्यातील पाण्याच्या नियोजनाची योजना सादर केली. त्यांनी सादर केलेली योजना 'दामोदर खोरे परियोजना' म्हणून ओळखली जाते. याच धरतीवर शासनाने १९९६ मध्ये कृष्णा, तापी, नर्मदा, गोदावरी अशी खोऱ्याची विभागणी केली. यावरून यांच्या दूरदर्शीपणाची खोली व लांबी लक्षात येते.

डॉ.आंबेडकर यांनी सर्वात महत्वाची संकल्पना मांडली ती 'शेतीचे राष्ट्रीयकरण' करण्याची. शासनाने शेतजमिनी ताब्यात घेऊन त्या शेतजमिनी विकसित कराव्यात अशा विकसित शेतजमिनी शेतकऱ्यांना काही अटीवर कसण्यासाठी दिल्या पाहिजेत. त्यांच्या मते एका अर्थाने सामुदायिक शेतीचाच प्रयोग होय. यासाठी शासनाने अधिनियम बनवावेत. उत्पादकता वाढ, पाणी उपलब्धता, पीकपद्धती, बांधबंदिस्ती, शेतमालाचे भाव, साठवण व्यवस्था, शेतमालाची विक्री या संदर्भात स्पष्ट नियम करावेत असे विचार मांडले. एवढेच नव्हे तर यामुळे एकाच पिकाखाली मोठे क्षेत्र येऊन शेतमालाच्या उपलब्धतेत विषमता निर्माण होणार नाही. पुरवठा व मागणी या अर्थशास्त्रीय नियमानुसार शेतमालाला रास्तभाव मिळतील. त्याबरोबरच अतिरिक्त उत्पादन टळून शेतमालाचे होणारे नुकसानही टळेल. पण आज शेतकऱ्यांना रास्तभाव शेतमालाला मिळविण्यासाठी शासनाशी झगडावे लागते. याचा विचार केला तर यांचे शेतीसाठी अधिनियम व कायदा असावा ही संकल्पना किती मोलाची आहे. हे यावरून अधोरेखित होते. यांच्या काही संकल्पनातूनच देशात कमाल जमीनधारणा कायदा, खोती व सावकारी पद्धतीना प्रतिबंध करणारा कायदा, सामुहिक शेतीचे प्रणालीवर आधारित शेती महामंडळ, राज्यातील नद्यांच्या खोऱ्यांची विभागणी व विकास, जलसंवर्धन योजना

अमलात आल्या. शासनाने यासंबंधी नियम व कायदे तयार करून घ्यावेत. डॉ. आंबेडकर यांच्या विचारातून प्रभाव दिसून येतो. यांचे शेतीबाबतचे विचार मौलिक, नियोजनात्मक तसेच शेतीसाठी अभ्यासपूर्ण आहेत.

शेतकऱ्यांच्या मोर्चाचे महत्त्व व खोती पद्धतीवर बंदी

शेतकऱ्यांना पहिला मान डॉ. आंबेडकर यांच्या नेतृत्वासाठी मिळून आला होता. हा मान इ.स. १९२८ ते १९३८ या कालावधीत रायगड जिल्ह्यातील 'चरी' या गावात बळकट सात वर्ष चालला होता. इ.स. १९२८ पासून यांनी गरीब, दरिद्री शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी शेतकऱ्यांचे प्रश्न हाती घेतले होते. त्यांनी कोकणातील शेतकऱ्यांना खोताच्या दास्यातून मुक्तता व्हावी म्हणून फार मोठी चळवळ सुरू केली होती. रत्नागिरी जिल्हा शेतकरी परिषद चिपळूण येथे १४ एप्रिल १९२९ ला आयोजित करण्यात आली होती. या शेतकरी परिषदेचे अध्यक्ष म्हणून डॉ. आंबेडकर हे होते. यांनी कोकणातील खोती पद्धती विरुद्ध शेतकऱ्यांचे आंदोलन उभारले. डॉ. आंबेडकर यांनी १० सप्टेंबर १९३८ ला २५,००० शेतकऱ्यांचा मोर्चा काढला होता. या शेतकऱ्यांच्या यशस्वी मोर्चानंतर शेतकऱ्यांची चळवळ अधिक तीव्र करण्याच्या उद्देशाने शेतकऱ्यांच्या परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी त्यांनी कोकणचा दौरा केला होता. शेतकऱ्यांच्या अनेक सभांमध्ये त्यांनी मार्गदर्शन केले. अनेक प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम केले. विशेष म्हणजे हे शेतकरी कुणबी मराठा, मुसलमान होते. यावरून डॉ. आंबेडकर यांनी केवळ जातीचा विचार न करता सर्व जातीधर्मांच्या शेतकऱ्यांसाठी चळवळ उभारली होती. सप्टेंबर १९१८ मध्ये शेतजमिनीच्या समस्येवर एक शोधनिबंध प्रकाशित केला. शेतकऱ्यांसाठी त्यांनी पीक विमा योजना सुचवली. श्रमिकांनी श्रमशक्ती उद्योग क्षेत्रात वळवायला हवी असे मत मांडले. तसेच शेतीचा विकास करण्यासाठी डॉ. आंबेडकर यांनी राज्य समाजवादाचा सिद्धांत मांडला आहे.

डॉ. आंबेडकर यांनी भूमिहीन मजूर, लहान जमिनी, खोती पद्धती, महारवतन, सामुदायिक शेती, जमीन महसूल आणि जमीनदारशाहीचे उच्चाटन या विषयावर त्यांनी विचार प्रकट केले होते. अस्पृश्य समाजात भूमिहीन मजुरांचेच प्रमाण अधिक असल्याने यावर त्यांनी मतप्रदर्शन केले होते. एवढेच नव्हे तर समाजवाद, सामाजिक समता, धान्य प्रश्न, उद्योगांचे राष्ट्रीयीकरण या सारख्या विषयांवरही डॉ. आंबेडकर यांनी मार्मिक लिखाण केले होते. गांधीवादाचे अर्थशास्त्र याद्वारे अर्थशास्त्रज्ञ म्हणून त्यांची योग्यता आजमावण्याचा प्रयत्न करता येईल. स्टेट्स अँड मायनॉरिटीज नावाने ब्रिटिश सरकारला १९४७ साली सादर केलेल्या टिपणामध्ये डॉ. आंबेडकर यांनी भारताच्या आर्थिक विकासाची योग्य धोरणे कोणती याविषयी मत मांडले होते. लोकांच्या आर्थिक जिवनाचे नियोजन करण्यासाठी अत्युच्च उत्पादन क्षमतेचा विचार यांनी केला होता. त्याबरोबरच खासगी उत्पादकांना कोणतीही आडकाठी न करता तसेच संपत्तीचे समान वाटप होईल यासारखे आर्थिक विचार करणे हे सरकारचे दायित्व आहे हे त्यांनी नमूद केले होते. यांच्या म्हणण्यानुसार आर्थिक लोकशाही प्रस्थापित करण्यासाठी कार्यक्रम आणि आर्थिक धोरण हे राज्य घटनेचे अविभाज्य भाग असले पाहिजेत. शेतीचे, मोठ्या उद्योगांचे राष्ट्रीयीकरण, प्रत्येक नागरिकासाठी सक्तीचा विमा योजना आणि आर्थिक प्रगतीला हातभार लावण्यासाठी खासगी उद्योजकांना वाव देण्याच्या आवश्यकतेचा अंतर्भाव असायला हवा हे कार्यक्रम शाश्वत होण्यासाठी त्यांना राज्य घटनेत मूलभूत गोष्टींना दर्जा असायला हवा असे मत यांनी मांडले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर असेही म्हणाले की, औद्योगिकरण आणि कृषीवाद भारतीय अर्थव्यवस्थेत वाद करू शकतात. यांनी शेतीला भारतातील प्राथमिक उद्योग म्हणून शेतीमधील गुंतवणूकीवर भर दिला. तसेच राष्ट्रीय आर्थिक आणि सामाजिक विकासाचे समर्थनही डॉ. आंबेडकरांनीकेले

निष्कर्ष

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शेतकरी, शेतमजूर, उपेक्षित, वंचित व महिलांना सामाजिक समतेचे हक्क मिळाले पाहिजे यासाठी लढा उभारल्याचे दिसून येते. यांनी शेती व शेतकरी यांचा विचार करून त्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम केले. भारतासारख्या कृषीप्रधान देशात शेतीचा विकास होणे गरजेचे आहे. ग्रामीण समाज हा पूर्णतः शेतीवर अवलंबून असल्याने शेतीला दुर्लक्षित करून चालणार नाही असे यावरून दिसून येते. ग्रामीण भागात विखुरलेल्या समाजाला एकसंघ करण्यासाठी शेतीचे चित्र बदलले पाहिजे. यांनी राष्ट्रीय आर्थिक आणि सामाजिक विकासाचे समर्थन केल्याचे पाहावयास मिळते. डॉ. आंबेडकर यांना ग्रामीण समाजव्यवस्थेची पुरेपूर जाण होती. तितकेच

शेतीबद्दलही भान होते हे दिसून येते. यांनी कोकण भागात शेतीतल्या खोती पद्धतीला विरोध करून शेतकऱ्यांच्या प्रश्नांना सोडवण्याचे काम केले.

शासनाला महसूल देणाऱ्या शेतीचे आर्थिक उत्तरदायित्व शासनाने उचलावे असे मत डॉ. आंबेडकर यांचे होते. शासनाने शेतकऱ्यांची जबाबदारी उचलणे गरजेचे आहे. शेती व्यवसायाला उद्योग मानून शेतीसाठी पायाभूत सुविधा पुरविणे गरजेचे आहे. शेती व्यवसायासाठी जमीन पाणी हे मुख्य घटक आहेत. देश समृद्ध होण्यासाठी शेतकरी व शेतमजूर समृद्ध झाला पाहिजे. यांच्या शेतीविषयक सूचनांची अमलबजावणी केली तर शेती व ग्रामीण भागाचे परिवर्तन नक्कीच घडेल. यावरुन डॉ.आंबेडकर हे शेतकऱ्यांचे कैवारी होते हे दिसून येते. त्यांच्या विचारांच्या उपेक्षेतून शासनकर्त्यांची उदासीनताच प्रकर्षाने दिसते. दुरदृष्टीचे, बुद्धिमत्तेचे, नवविचारांचे, राष्ट्रहिताचे, मानवतेचे, सर्व समाजाच्या कल्याणाचे दर्शन घडविणारे डॉ.आंबेडकर विश्वयात्री होते हे यावरून स्पष्ट होते यांचे शेतीबाबतचे विचारधन आज शेतकरी, शेतमजूर, राज्यकर्ते, शेतीतज्ञ व नियोजनकारांनी अभ्यासले पाहिजे.

संदर्भ:


1 The Buddhist Social Network of India
2 https://www.feceebook.com
3 https://www.instagram.com
4 Loksatta.com-d
5 Lokmat.com
6 mr.m.wikipedia.or